दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : १६४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.२५ जानेवारी २०२५







## पडताळणीपूर्वीच अहिल्यानगर जिल्ह्यात २२६ ‘बहिणीं’ची माघार



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, अहिल्यानगर :** पात्रता निकषात न बसणार्या महिलांना लाडकी बहीण योजनेतून वगळण्यासाठीची पडताळणी मोहीम राबवण्याच्या आधीच राज्यभरातून महिलांनी ‘योजना नको’ असा अर्ज करण्यास सुरूवात केली आहे. महिला व बालविकास विभागाच्या स्थानिक पातळीवरील शासकीय कार्यालयात योजनेचे लाभ थांबवण्याची विनंती करणारे अर्ज येत आहेत. नगर जिल्ह्यात देखील असे अर्ज येण्यास सुरूवात झाली आहे. तालुका पातळीवर आतापर्यंत ११० अर्ज प्राप्त झाले तर शहरी भागातून ११६ असे एकूण २२६ म हिलांचे अर्ज प्राप्त झाले असल्याची माहिती महिला बालकल्याण विभागाच्यावतीने देण्यात आली. दरम्यान, लाडकी बहिण योजनेचा लाभ घेतलेल्या महिलांच्या अर्जाची पडताळणी होऊन पडताळणीत अपात्र ठरल्यास मिळवलेल्या लाभाची रक्कम दंडासहित वसूल करण्यात येण्याच्या भीतीने ही ‘अर्ज माघार’ सुरू असल्याची चर्चा आहे. महायुती सरकारने गेल्या वर्षी जुलै महिन्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जाहीर केली. राज्यातून दोन कोटी ६३ लाख महिलांनी या योजनेसाठी अर्ज केले. दोन कोटी ४७ लाख महिला पात्र ठरल्या. त्यातील दोन कोटी ३४ लाख बहिणींना विधानसभा निवडणुकीअगोदर पाच महिने दरमहा दीड हजार रुपये देण्यात आले. अहिल्यानगर जिल्ह्यात या योजनेत १२ लाख २० हजार महिला योजनेत पात्र ठरल्या होत्या. या महिलांना गेल्या पाच महिन्यांत ९०४ कोटी रुपयांची मदत सरकारच्यावतीने करण्यात आली. योजनेचा लाभ घेतांना महिलांकडून केवळ स्वयंम घोषणापत्र घेत त्यांना योजनेचा लाभ देण्यात आला. मात्र, राज्यातील विधानसभा निवडणुकीनंतर सरकारने योजनेत पात्र ठरलेल्या महिलांची पडताळणी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्यातून हजारोंच्या संख्येने महिलांनी या योजनेतून माघार घेण्यासाठी अर्ज माघार घेण्यासाठी स्थानिक पातळीवर महिला बालकल्याण विभागाकडे अर्ज करण्यास सुरुवात केली आहे.

## कुंडलवाडीचे दोन पोलीस अधिकारी लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२४, नांदेड :** बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी पोलीस स्टेशनच्या दोन पोलीस अधिकाऱ्यांना २३ जानेवारी रोजी लाचलुचपत विभागाने रंगेहाथ पकडले आहे. या दोन्ही अधिकाऱ्यांवर १७ हजार रुपयांची लाच घेण्याचा आरोप आहे या प्रकरणामुळे तालुक्यातील सर्व अधिकाऱ्यांची धाबे दणाणले आहेत.

कुंडलवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत चालू असलेल्या गंजगाव रेती घाटावरून हायवाने रेती वाहतूक करण्यासाठी फिर्यादी यांच्याकडून सहाय्यक पोलीस निरीक्षक भागवत तुकाराम नागरगोजे पोलीस उपनिरीक्षक नारायण मारोतराव शिंदे यांनी २५ हजार रुपयांची लाच मागितली. तडजोडी अंती १७ हजार रुपये देण्याचे मान्य करून फिर्यादीने लाचलुचपत विभाग नांदेड यांच्याशी संपर्क केल्यावर लाचलुचपत विभागाने सापळा रचून दिनांक २३ रोजी दुपारी थेट पोलीस स्टेशन कुंडलवाडी येथे फिर्यादीकडून सहाय्यक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे पोलीस उपनिरीक्षक नारायण शिंदे यांनी १७ हजार रुपये लाच घेताना रंगेहाथ पकडून त्यांच्यावर कारवाई केली.

या कार्यवाहीमुळे तालुक्यातील सर्व अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून पोलीस अधिकाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात रेती माफिया व अवैध धंदेवाल्याकडून सर्रास हप्तेखोरी चालू होती. तर सर्वसामान्य नागरिकांनी पोलीस स्टेशन येथे तक्रार घेऊन गेलेल्या व्यक्तींकडून ही आर्थिक लूट केली जात होती त्यामुळे सर्वसामान्य नागरिक या कारवाईमुळे समाधान व्यक्त करून रक्षकच भक्षक झाल्याची चर्चा शहरात करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक लाचलुचपत विभागसंदीप पालवे अप्पर पोलीस अधिक्षक डॉ संजय तुंगार पोलीस उपाधीक्षक प्रशांत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रीती जाधव पोलीस अमलदार राजेश राठोड बालाजी मेकाले ईश्वर जाधव आदींनी केली

याप्रकरणी पुढील तपास सुरू आहे दोन्ही आरोपीवर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्या अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे.

## पत्रकारांच्या तीन पिढ्यांचा मार्गदर्शक हरपला

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२४, ठाणे :** धडाडीचा पत्रकार या व्याख्येत बसणारा, पत्रकारांच्या तीन पिढ्यांचा कृतीशील मार्गदर्शक हरपला, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ पत्रकार रामभाऊ जोशी यांच्या निधनाबद्दल श्रद्धांजली वाहिली आहे.

ज्येष्ठ पत्रकार रामभाऊ जोशी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून दीर्घकाळ अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा फोडत राहीले. साहित्य, राजकारण, संगीत आणि सामाजिक क्षेत्रात त्यांचा धडाडीचा सहभाग राहीला. प्रत्यक्ष घटनास्थळी पोहोचून वृत्तांकन करण्याची त्यांची धडाडी होती. पुण्यातील पत्रकारिता, संघटन तसेच राष्ट्रीयस्तरावरील नेतृत्व यांसह सांस्कृतिक क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान महत्वाचे ठरले. माणूस केंद्रबिंदू मानून त्यांनी पत्रकारिता केली. समाजातील वंचितांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी लेखणी चालविली. पत्रकारांच्या तीन पिढ्या घडवितांना तरूणाईत विचारांचे बीजारोपण महत्त्वाचे हे सातत्याने सांगितले. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी शोकसंदेशात म्हटले आहे.

## एसटीच्या तिकीट दरात मोठी वाढ, रिक्षा आणि टॅक्सीचा प्रवासही महागणार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२३, मुंबई :** एसटी महामंडळाने गेल्या तीन वर्षात एसटीच्या तिकीट दरात कोणतीही वाढ केली नव्हती. मात्र, आता एसटीचा प्रवास महागला आहे.




एसटीच्या तिकीट दरात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एसटी महामंडळाने भाडेवाढीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवला आल्याचं काही दिवसांपूर्वी सांगितलं जात होतं. यानंतर अखेर आता एसटीच्या तिकीट दरात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, यासंदर्भातील माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. याबरोबरच रिक्षा आणि टॅक्सीचा प्रवासही महागणार आहे. १ फेब्रुवारीपासून रिक्षा आणि टॅक्सीची देखील भाडेवाढ होणार असल्याची माहिती प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

**प्रताप सरनाईक काय म्हणाले?**

आज मी राज्याच्या प्रधान सचिवांबरोबर चर्चा केली. तेव्हा त्यांनी सांगितलं की गुरुवारी एक महत्वाची बैठक झाली. त्या बैठकीत एसटीच्या भाडेवाढीबाबत निर्णय घेण्यात आला आहे. कारण गेल्या अनेक वर्षांपासून एसटीची भाडेवाढ करण्यात आली नव्हती. आता एसटीची १४.९७ टक्के भाडेवाढ करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तसेच एसटीची ही भाडेवाढ आजपासून लागू करण्यात येणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

**रिक्षा आणि टॅक्सीचा प्रवासही महागणार**

१ फेब्रुवारीपासून रिक्षा आणि टॅक्सीची देखील भाडेवाढ होणार आहे अशी माहिती मला सांगण्यात आली आहे. मात्र, यासंदर्भातील फाईल माझ्यापर्यंत आलेली नाही. पण भाडेवाढीबाबतची फाईल माझ्यापर्यंत येईल. खरं तर एसटीची भाडेवाढ गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. एसटीच्या तिकीट दरात दरवर्षी वाढ करणं गरजेचं असतं. कारण प्रवाशांना सुविधा देत असताना एसटी महामंडळाला खर्चही येतो. यामध्ये डिझेलचा दर दिवसेंदिवस वाढत चालला आहे. तसेच कर्मचाऱ्यांचे पगार वाढले आहेत. यातच एसटी म हामंडळाची परिस्थिती आपण पाहिली तर दरदिवशी सुमारे ३ कोटींचा आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. अशा परिस्थितीत भाडेवाढ करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही, असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे.

**एसटीची किती टक्के भाडेवाढ होणार?**

एसटीच्या भाडेवाढीसंदर्भातील परिपत्रक आज निघेल. तसचे एसटीची भाडेवाढ ही १४.९७ टक्के करण्यात येणार आहे. तसेच राज्य सरकारने एसटी प्रवासात ज्या सवलती दिलेल्या आहेत त्या सवलती बंद करण्यात येणार नाहीत. त्या सवलती सुरुच राहतील. तसेच महिलांना एसटी तिकीटातून ५० टक्क्यांची सूट देखील सुरु राहणार आहेत, असंही मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितलं.

**रिक्षा आणि टॅक्सीची किती भाडेवाढ होणार?**

रिक्षा आणि टॅक्सीची भाडेवाढ ही ३ रुपये प्रति किलोमीटर होणार आहे. तसेच रिक्षा आणि टॅक्सीची ही भाडेवाढ १ फेब्रुवारीपासून लागू असणार आहे, असंही मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केलं आहे.

## कानातील हेडफोन बेतला जीवावर !

### रेल्वे रूळ ओलांडताना ट्रेनच्या धडकेत शालेय विद्यार्थिनीचा दुर्दैवी मृत्यु

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२४, सफाळे :** कानात हेडफोन घालून रेल्वे रूळ ओलांडणे एका सोळा वर्षांच्या विद्यार्थिनीच्या जीवावर बेतले आहे. सफाळे रेल्वेस्थानक परिसरात रेल्वे रूळ ओलांडताना रेल्वेच्या धडकेत विद्यार्थिनीचा जागीच मृत्यू झाला आहे. वैष्णवी मयूर रावल असे मृत विद्यार्थिनीचे नाव असून या दुर्दैवी घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

सध्याच्या मोबाईल युगात शालेय, महाविद्यालय विद्यार्थी, तरूण-तरूणी सर्वांकडेच मोबाईल असतो. कानात इअर फोन, हेडफोन घालून मोबाईमधून मोठ्या आवाजात गाणी ऐकून बहुतांश जण प्रवास करत असतात. इअर फोन घातल्यामुळे आजूबाजूचा आवाज ऐकू येत नाही व आजूबाजूला काय सुरू आहे, याबाबत देखील कोणता ठाव ठिकाणा राहत नाही. त्यामुळे रेल्वे रूळ अथवा रस्ता ओलांडताना अपघात होऊन अनेकांना आपला जीव गमवावा लागत आहे. अशीच काहीशी दुर्दैवी घटना सफाळे रेल्वे स्थानक परिसरात घडली आहे. इअर फोन कानात घालून रेल्वे रूळ ओलांडत असताना रेल्वेच्या धडकेत विद्यार्थिनीचा जागीच मृत्यू झाला आहे.

वैष्णवी मयूर रावल ही सोळा वर्षाची इयत्ता दहावीत शिक्षण घेणारी विद्यार्थिनी पालघर जिल्ह्यातील माकणे येथील रहिवासी असून तिचा क्लास संपवून ती घराकडे निघाली होती. माकणे येथे जाण्यासाठी सफाळे रेल्वे स्थानक परिसरातून पूर्वेकडून पश्चिमेकडे जावे लागते. पश्चिम रेल्वेच्या सफाळे रेल्वे स्थानक परिसरातून सफाळे पूर्वे कडून पश्चिमेकडे जाण्यासाठी रेल्वेरूळ ओलांडत असताना, वैष्णवीने कानात इअरफोन घातला होता. रेल्वेरूळ ओलांडत असताना मुंबईहून गुजरातच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव राजधानी एक्स्प्रेस ट्रेनने तिला जोरदार धडक दिली,



भरधाव ट्रेनच्या धडकेत वैष्णवी गंभीररीत्या जखमी झाल्याने तिचा जागीच मृत्यू झाला आहे. गुरुवारी दुपारच्या सुमारास ही दुर्दैवी घटना घडली आहे. दरम्यान या घटनेची माहिती मिळताच रेल्वे पोलीस घटनास्थळी दाखल झाले व मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला असून याप्रकरणी अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

सोळा वर्षाच्या वैष्णवीच्या मृत्यूची बातमी कळताच तिच्या आईने अक्षरशः टाहो फोडला. वैष्णवीचा रेल्वेच्या धडकेत दुर्दैवी मृत्यू झाल्याने तिच्या कुटुंबीयांवर अक्षरशः दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेमुळे परिसरात देखील शोककळा पसरली आहे.

सफाळे पूर्व परिसरातून पश्चिमेकडे रेल्वे रूळ ओलांडून जाण्यासाठी पश्चिम भागात जाण्यासाठी रेल्वे फाटकाजवळ पादचारी पुल नाही. त्यामुळे नागरिक, विद्यार्थी रेल्वे रूळ ओलांडण्याचा मार्ग अवलंबतात. रेल्वेच्या धडकेत विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याची घटना परिसरातील नागरिकांना कळताच म ाकडे परिसरातील नागरिकांनी देखील घटनास्थळी गर्दी केली व नागरिक देखील प्रशासना विरोधात आक्रमक झाले. या घटनेनंतर तरी प्रशासनाला जाग येईल का? असा संतप्त सवाल स्थानिकांनी उपस्थित केला आहे. सफाळे परिसरात येण्या- जाण्यासाठी रेल्वे फाटक परिसरात पादचारी पूल लवकरात लवकर उभारण्यात यावा अशी जोरदार मागणी स्थानिकांनी केली आहे.

## कोपरी परिसरात बर्ड फ्लूचा शिरकाव ! ठाण्यातील चिकन, मटणाची दुकाने बंद

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.२२, कोपरी (ठाणे) :** ठाण्यातील कोपरी परिसरातही बर्ड फ्लूचा शिरकाव झाल्याने प्रशासनाची डोकेदुखी वाढली आहे. कोपरी परिसरात देशी प्रजातीतील कोंबडी आणि टर्की कोंबडी यांचा १४ जानेवारीला मृत्यू झाला होता. कोंबड्यांचा मृत्यू बर्ड फ्लूने झाल्याचा अहवाल राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागाकडून ठाणे महापालिकेला प्राप्त झाला आहे. त्यामुळे कोपरीमधील चिकन आणि मटणाची दुकाने पुढील आदेश येईपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश पालिका प्रशासनाकडून देण्यात आले आहे.

ठाण्याचे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या शासकिय निवासस्थानात पाळलेल्या कोंबड्यांना बर्ड फ्लूची लागण झाल्याने खळबळ उडाली होती. या रोगाचा प्रसार जिल्ह्यात इतर ठिकाणी होऊ नये म्हणून जिल्हा प्रशासनाने पाऊले उचलले आहे. दरम्यान, बर्ड फ्लू आजाराने कोपरी परीसरातही शिकराव केल्याने मांसाहार खाणाऱ्या खवय्यांची अडचण झाली आहे. कोपरी परिसरात देशी प्रजातीतील कोंबडी आणि टर्की कोंबडी यापार्श्वभूमीवर कोपरी परिसरात सुरक्षेचा उपाय म्हणून कोंबडी आणि मटण विक्रीला बंदी



करण्यात आली आहे. शहरात बर्ड फ्लयू चा प्रादुर्भाव वाढत असल्याचे पत्र ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाने मनपाला पाठवले आहे.

**कळवा रुग्णालयात विशेष कक्ष...**

महापालिकेची आरोग्य यंत्रणा सर्तक झाली आहे. त्यानुसार यावर उपाय योजना आखण्यात आल्या आहेत. यात कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात विलीगीकरण कक्ष सज्ज ठेवण्यात आला आहे. तसेच पुरेसा औषध साठा, डॉक्टरांसह इतर पथक देखील सज्ज झाली आहे. रुग्णालयात एकूण १९ बेड सज्ज ठेवण्यात आले आहे. त्यातील १५ साधे तर ४ आयसीयू चे बेड आहेत. तसेच डॉक्टर आणि परिचारिका यांचे पथक ही तयार ठेवण्यात आले आहे.

**भरारी पथक..**

पशुसंवर्धन विभागाच्या उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एव्हियन इन्फ्लूएंजा कंट्रोल मार्गदर्शन तत्वे जाहिर करण्यात आली आहेत. पॉझिटिव्ह सापडलेल्या पक्षांच्या ठिकाणापासून एक किलोमीटर क्षेत्रात सर्वच चिकन व अंडी विक्री दुकाने जिल्हाधिकारी व दंडाधिकारी यांच्या आदेशान्वये बंद करण्यात आलेली आहेत. तसेच मांस विक्रेते करणाऱ्यांना स्वच्छता बाळगण्याबाबत आदेश देण्यात आले आहे.

**भरारी पथकाची नजर...**

पशुसंवर्धन विभाग तसेच ठाणे महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभाग, कोंडवाडा विभाग व सार्वजनिक आरोग्य विभागमधील कर्मचाऱ्यांचे भरारी पथक तयार करण्यात आले आहेत. हे पथक जिल्ह्यात अनेक ठिकाणी सर्वेक्षण करणार असून बाधित क्षेत्रात बाधित मांस दुकानांमध्ये कोंबड्या विक्रीसाठी येणार नाही यावर नजर बारकाईने ठेवणार आहेत. पशुसंवर्धन विभागाच्या उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एव्हियन इन्फ्लूएंजा कंट्रोल मार्गदर्शन तत्वे जाहिर करण्यात आली.

# संपादकीय



## डिजिटल विद्यापीठ !

सध्या उच्च शिक्षणात जागतिक पातळीवर अभूतपूर्व वेगाने बदल होताना आपल्याला दिसत आहे, हे मुख्यत्वे विद्यार्थ्यांच्या आणि जागतिक कार्यबलाच्या सतत बदलत्या गरजांशी जुळवून घेण्यासाठी होत आहे. त्यात आता डिजिटल विद्यापीठाचा उदय होत आहे. डिजिटल विद्यापीठ ही एक अशी शैक्षणिक संस्था आहे जी जीवनाच्या सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांना लवचीक सुलभ आणि उच्च गुणवत्तेचे शिक्षण देण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करते. हे विद्यापीठ इंटरनेट आणि संप्रेषण तंत्रज्ञानाद्वारे विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन अभ्यासक्रम प्रामुख्याने प्रदान करते. त्याबरोबर डिजिटल विद्यापीठे अनेकदा ऑनलाइन आणि प्रत्यक्ष शिक्षण अशा दोन्ही पद्धतीने विद्यार्थ्यांना अध्यापन करते. अशी विद्यापीठे विद्यार्थ्यांना जगभरातील शिक्षकांकडून शिकण्याची संधी देतात ज्यामुळे वैविध्यपूर्ण आणि सर्वसमावेशक शिक्षण वातावरण निर्माण होते. ही विद्यापीठे आजीवन शिक्षणाच्या संस्कृतीला प्रोत्साहन देतात आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या कारकीर्दीत त्यांची कौशल्ये व ज्ञान सतत विकसित करण्यात प्रोत्साहित करतात.

भारतात, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये (२०२०) अनेक शैक्षणिक सुधारणा सुचवल्या आहेत, त्यात विद्यार्थ्यांना त्यांच्या दाराशी वैयक्तिकृत अनुभवांसह जागतिक दर्जाचे सार्वत्रिक शिक्षण प्रदान करणे, हीदेखील शैक्षणिक सुधारणा सुचविली आहे. त्यासाठी डिजिटल विद्यापीठाची स्थापना करणे हे जरुरीचे ठरते. त्यादृष्टीने भारतात नॅशनल डिजिटल विद्यापीठ या पहिल्या डिजिटल विद्यापीठाची सुरुवात झाली आहे. केरळ युनिव्हर्सिटी ऑफ डिजिटल सायन्सेस इनोव्हेशन अँड टेक्नॉलॉजी हे भारतातील पहिले डिजिटल विद्यापीठ केरळ सरकारने २०२० मध्ये सुरू केले. विज्ञान, तंत्रज्ञान आणि मानव्य शास्त्रातील संशोधन आणि शिक्षणावर लक्ष केंद्रित करून देशातील ज्ञान क्रांतीचे प्रमुख प्रेरक बनणे हे या विद्यापीठाचे उद्दिष्ट आहे. महाराष्ट्रातही विद्यार्थ्यांना लवचीक, आकर्षक व दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्देशाने डिजिटल विद्यापीठ स्थापन करण्याचे योजिले आहे. आज इंटरनेट, स्मार्टफोन व इतर डिजिटल उपकरणांच्या वाढत्या वापरामुळे ऑनलाइन शिक्षण देणे अधिक सुलभ झाले आहे तसेच विद्यार्थ्यांना लवचीक शिक्षण पर्यायाची गरज भासत आहे. ही डिजिटल विद्यापीठे कधीही व कुठेही अभ्यास करण्याची लवचीकता प्रदान करतात, त्यामुळे काम करणाऱ्या व्यावसायिकांना किंवा पालकांना, गृहिणींना आणि दुर्गम भागात राहणाऱ्यांना पण शिक्षण घेणे सुलभ होऊ शकते. पारंपरिक विद्यापीठातील शैक्षणिक शुल्कापेक्षा स्वस्त व परवडणारे शैक्षणिक कार्यक्रम ही विद्यापीठे देऊ शकतात.

परंतु, डिजिटल विद्यापीठाबद्दल काही प्रश्न उपस्थित होत आहेत. जरी विद्यापीठ अनुदान आयोगाने ऑफलाइन व ऑनलाइन या दोन्ही प्रकारच्या पदवींना समान महत्त्व दिले तरी ऑनलाइन पदवी ही नियमित पदवीइतकीच उपयुक्त ठरणार आहे का? नियोक्ते डिजिटल विद्यापीठाची पदवी प्राप्त करणाऱ्यांना नोकरी प्रदान करणार आहेत का? पारंपरिक शिक्षणात वर्गात विद्यार्थी व शिक्षकांची सुसंवाद व क्रियाकलाप, हे अध्यापन किंवा अध्ययन, ऑनलाइन शिक्षण पद्धतीपेक्षा अधिक प्रभावी करतात. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने उच्च शिक्षणात, शिक्षक – विद्यार्थी गुणोत्तराचे प्रमाण १:२० वर आग्रही असताना ऑनलाइन पद्धतीत अमर्याद विद्यार्थी राहू शकतात, त्यामुळे विद्यार्थ्यांवर वैयक्तिक लक्ष देणे कितपत शक्य होईल, याबाबतही शंका उपस्थित होते. तसेच दुर्गम भागात खराब इंटरनेट कनेक्टिव्हिटी हीसुद्धा डिजिटल विद्यापीठासाठी मोठे आव्हान ठरू शकते.

# मंत्रीद्वयांचे ‘सत्य’ कथन आणि बोकाळलेला भ्रष्टाचार

शासन-प्रशासन व्यवस्थेतील प्रत्येक टप्प्यावर भ्रष्टाचार बोकाळला आहे हे काही गुपित राहिलेले नाही, अगदी गल्लीपासून दिल्ली पर्यंत चिरीमिरी पासून करोडो रुपयांचा भ्रष्टाचार होतो आणि भ्रष्टाचाराचा कँन्सर समाजाला अधिकाधिक पोखरत आहे हे वास्तव आहे, गावच्या तलाठी कार्यालयापासून थेट मंत्रालयापर्यंत भ्रष्टाचार होत असल्याच्या चर्चा नेहमीच होत असतात.राजकारणी, वरिष्ठ नोकरशहां, कंत्राटदार, बांधकाम व्यावसायिक, गुन्हेगार, यांच्यात भ्रष्टाचाराची साखळीच निर्माण झाली आहे.मात्र राज्यकर्ते म्हणून सहजासहजी ते कोणी मान्य करत नाही. कृषी मंत्री असल्याने त्यांना पिक विमा योजनेतील भ्रष्टाचाराबाबत प्रश्न विचारला तेव्हा पण अनावधानाने का होईना मंत्री माणिकराव कोकाटे यांनी कुठल्याही योजनेत २-५ टक्के इतका भ्रष्टाचार मान्य केला. पीक वीमा योजना ही काही जणांसाठी चराऊ कुरणे बनले आहे आणि शेतकऱ्यांच्या नावावर भलतेच याचे लाभार्थी ठरत आहेत आणि जनतेचा पैसा लुटत आहेत. पीक विमा योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी खाजगी वीमा कंपन्या कार्यरत आहेत आणि नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, यापासून शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेले नुकसान भरपाई पीक विमा कंपन्यांकडून दिली जाते. या योजनेमध्ये शेतकऱ्याला विमा रकमेच्या एक ते दोन टक्क्यांपर्यंत प्रिमियम भरावा लागतो तसेच राज्य सरकारे आणि केंद्र सरकार साधारणपणे प्रत्येकी आठ टक्क्याचा भार ऊचलुन विमा कंपन्यांना १८ ते २० टक्क्यांचा प्रिमियम दिला जातो, अर्थातच हा प्रिमियम सरकार जनतेच्या कर रूपाने जमा झालेल्या पैशातूनच दिला जातो. देशभरात पिक विमा ऊतरविणाऱ्या साधारणपणे दहा खाजगी विमा कंपन्या कार्यरत आहेत. आम्हीच शेतकऱ्यांचे कैवारी असल्याचा आव आणत सरकारने एक रूपयात पीक विमा योजना आणली याचाच अर्थ ऊर्वरित भार हा सरकारच्या तिजोरीवरच पडतो, म्हणजेच अप्रत्यक्ष जनतेवरच. दरवर्षी शेतकऱ्यांना दिली जाणारी किरकोळ नुकसान भरपाई हा आजवरचा अनुभव आहे त्याच वेळी पिक विमा कंपन्याच मालामाल होतात. एक रुपयात विमा योजना ही चांगल्या ऊद्देशाने आणली गेली असली तरी बीड पॅटर्न ने या योजनेचे खरे लाभार्थी कोण ठरत आहेत हे आता अधोरेखित झाले आहे. आपण सगळे भाऊ भाऊ मिळून सारे लुटून खाऊ अशीच परिस्थिती सर्वत्र आहे.मात्र यात शेतकरी आणि सामान्य जनता मात्र लुटली जात आहे. पिक विमा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी काढावा यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदीं पासुन सगळेच जाहिरातबाजी करतात, पीक कर्ज घेतांना पिक विमा काढण्याची बँका सक्ती करतात, पण नुकसान भरपाई च्या वेळी शेतकऱ्यांच्या हातात 'रेवडी' पडते. काही वर्षांपूर्वी खुद्द शिवसेनेचे पक्ष प्रमुख ऊद्धव ठाकरे यांनी मुंबईत मोठा गाजावाजा करून एका खाजगी पिक विमा कंपनीवर मोर्चा काढला होता, पण त्याने काहीच बदल झाला नाही. आजही एकिकडे या विमा कंपन्या आपल्या तुंबड्या भरत आहेत, तर दुसरीकडे जगाचा 'पोशिंदा' सर्व बाजूंनी नाडला जावुन आपले जिवन संपवत आहे. राज्यातील आत्महत्यांचे सत्र अजूनही थांबायला तयार नाही. तेव्हा या योजनांचा खरा लाभ कोणाला होत आहे याचा गांभीर्याने विचार करायला हवा. शेतकऱ्यांच्या भल्याचा देखावा करीत ईतर कार्पोरेट कंपन्या करोडो रुपयांची नफेखोरी करीत असतील, शेतकऱ्यांच्या नावाने बीड पॅटर्न राबवित इतरच लाभार्थी ठरत असतील तर, याला आळा घालण्यासाठी कठोर कारवाई होणे गरजेचे आहे.मात्र अशी कारवाई केली जावी अशी ना कोणाची प्रामाणिक इच्छाशक्ती ना मानसिकता. त्यामुळे मंत्री कोकाटे म्हणतात त्याप्रमाणे २-५ टक्के होणारा भ्रष्टाचार मान्य करायचा का?.

तर दुसरीकडे पिढ्यान पिढ्या सत्तापदावर राहिलेले राधाकृष्ण विखे पाटील यांनी तर भ्रष्टाचाराला, गुन्हेगारी प्रवृत्तीला कसे पाठिशी घालते जाते आणि कसे पाठबळ दिले जाते आणि सत्ताधाऱ्यांना वरिष्ठ अधिकारी कसे साथ देतात याचे गुपित ऊघड केले मात्र अनावधानाने आपण काय बोलुन गेलो हे लक्षात येताच आपण गमतीने म्हणालो अशी सारवासारव केली मात्र जनतेला जे कळायचे होते ते कळाले. तसेही 'ये पब्लिक है ये सब जानती है'.

विकासकामे काढली जातात, किंवा जनहिताच्या योजना आखल्या जातात त्या खरोखरच जनहितासाठी असतात का कि योजनांच्या निधीतील कोणाला किती वाटा, कोणाला कंत्राट द्यायचे याचा विचार करून विकास कामे काढली जातात. भाडे तत्त्वावर एसटी साठी बसेस घेण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थगित केला का तर आपल्या लाडक्या कंत्राट दाराचे भले व्हावे म्हणून बसेस खरेदी करण्याचा अट्टहास चालला होता आणि यात जवळपास दोन हजार कोटी रुपयांचा तोटा एसटी ला होऊ शकला असता. एखाद्या साधा अधिकारी किंवा एखादा गावातील नगरसेवक अल्पावधीतच कोट्यावधी रूपयांची माया जमा करतो. रस्ते बांधणी साठी 'एमएसआर डीसी' ची स्थापना करण्यात आली मात्र त्यामधे सर्व पक्षीय लाडक्या अधिकाऱ्याचीच नेमणूक होते आणि तो तीनशे कोटी रुपये कमावुन मालामाल होतो. भ्रष्टाचार मुक्त भारत च्या कितीही वल्गना होत असल्या तरी भारतातील भ्रष्टाचार निर्मूलन होणे नाही, कारण तशी ना कोणाची प्रामाणिक इच्छाशक्ती ना मानसिकता.२०१४ साली देशात सत्तांतर झाले तेच मुळात भ्रष्टाचाराच्या मुद्यावरून. मोदी पंतप्रधान झाले आणि त्यांनी 'ना खाऊंगा ना खाने दूंगा ची घोषणा केली होती तेव्हा वाटले होते मोदी भ्रष्टाचाराचे कर्दनकाळ ठरतील, भ्रष्टाचार मुक्त भारत करतील, मात्र झाले भलतेच. गेल्या दहा वर्षांत मोदी यांच्या करनी आणि कथनी मधे जमीन आस्मानाचे अंतरच दिसले. पीएम केअर फंड, निवडणुक रोखे योजना, ईतर पक्षातील भ्रष्टाचाऱ्यांवर आपल्याच पक्षातील नेत्यांकरवी आरोप खरे खोटे आरोप करायचे, त्याचा आधार घेत ईडी सिबीआय सारख्या यंत्रणांचा गैरवापर करुन कारवाई करायची आणि कालांतराने त्यांना आपल्या पक्षात घेऊन, भाजप ब्रँड वॉशिंग मशीन मध्ये टाकुन भ्रष्टाचार मुक्त करायचे ही कार्यपद्धती अवलंबली गेली. निवडणूक रोखे योजनेच्या निमित्ताने सरकारी भ्रष्टाचाराचे भिषण वास्तव समोर आले. यंत्रणा जणु सरकारी पक्षासाठी, खंडणी वसूल करण्याचेच काम करतात का याचे कटु सत्य देशासमोर आले ते देखील न्याय व्यवस्थेमुळे, अन्यथा तेरी भी चूप मेरी भी चूप,अशा पद्धतीने ही लुट चालुच राहिली असती. निवडणूक रोख्यांचा सर्वात जास्त लाभार्थी सत्ताधारी भाजप ठरला तर इतर पक्षांना देखील आपला वाटा मिळाला. न्यायालयाने निवडणूक रोखे असंविधानिक ठरवले. सत्तेतून पैसा आणि पैशातुन सत्ता मिळवण्यासाठी सगळेच गंगेत हात धुवून घेतात.कै राजीव गांधी यांनी केंद्रातुन एक रुपया पाठवला तर खाली पंधरा पैसेच पोहचतात असे म्हटले होते तर ठाणे महापालिकेतील भ्रष्टाचाराबाबत भाष्य करतांना ४१ टक्के वाटण्यात जातात असे कै. आनंद दिघे यांनी म्हटले होते. भ्रष्टाचार कालही होता आजही कायम आहे ऊद्याही होत रहाणार. पण आजवर कोणीही भ्रष्टाचाराचे ऊघड समर्थन केले नाही, आता मंत्रीच भ्रष्टाचार मान्य करु लागले आहेत



**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

## सत्ता जुगार..




जुगार झाला सत्तेचा
का दगा देता नेहमी
राहू डावात एकनिष्ठ
मिथ्या ठरवता हमी

उलटसुलट पत्ते सारे
खेळविते आम्हां रमी
व्याजसहमुद्दलसुध्दा
परत फेड एकरकमी

केली कायम गुलामी
घेवून पडती बाजू मी
ऐनवेळी डावले डावा
कळेना कुठेपडे कमी

प्रतिपक्षांत प्रवेशकरे
ते कसे एक्के हुकुमी
चालली चेष्टामस्करी
जोकर पुढे झुकू मी

निर्णायक होता युध्द
सैनिक अर्धे जखमी
आव्हान द्यायचे कसे
कशी पेलतो जोखमी

राणी लावली पणाला
कितीकशी रे बेशरमी
जिंकायची नशा भिने
टिकास्त्रझोंबते वरमी

स्थीर राही जिंकणारा
अबाधित त्याची गुर्मी
जुगार पुन्हा खेळावा
हरणा-यांस येते उर्मी

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध अचूक बातमी

# राष्ट्रीय मतदार दिन !!

स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन हे दोन आपले राष्ट्रीय सण आहेत हे आपणा सर्वांना माहीतच आहे या दिवशी देशभक्ती ओसंडून वाहत असते पण या दिवसा इतकाच आजचा दिवसही तितकाच म्हत्वाचा आहे हे अनेक लोकांना माहीत नाही. आज २५ जानेवारी आज राष्ट्रीय मतदार दिन.आजच्याच दिवशी भारतीय लोकशाहीचा पाया रचला गेला.

आजच्याच दिवशी म्हणजे २५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली म्हणून हा दिवस संपूर्ण देशात राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो. भारतीय लोकशाहीने प्रत्येक सुजाण नागरिकाला मतदानाचा मूलभूत हक्क बहाल केला आहे. त्यामुळे मतदार यादीत नाव नोंदवून प्रत्येक नागरिकांनी निवडणुकीत आपले मतदान नोंदवून लोकशाही बळकट करावी असा उद्देश या दिवसामागे आहे. म्हणून या दिवशी भारत निवडणूक आयोग विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन मतदानासंदर्भात जनजागृती करते. या दिवशी १८ वर्ष पूर्ण झालेल्या नवीन मतदारांची नोंद करून त्यांना भारत निवडणूक आयोगाचे ओळखपत्र दिले जाते. मतदान हे प्रत्येक सुजाण नागरिकांचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. १८ वर्ष पूर्ण झालेल्या प्रत्येक नागरिकांना संविधानाच्या अनुच्छेद ३२६ नुसार मतदानाचा हक्क दिला आहे. मतदान करणे ही देखील देशसेवाच आहे. त्यामुळे जास्तीतजास्त लोकांनी मतदान करुन भारतीय लोकशाहीला बळकट करायला हवे मात्र आपल्या देशात आजही मतदार मतदानाबाबत गंभीर आहेत असे दिसत नाही. घटनाकारांनी मतदानाचा अधिकार बहाल करून देशवासियांना खूप मोठे अस्त्र दिले आहे पण दुर्दैवाने आजही लोकांना त्याचे महत्व नाही म्हणूनच आपल्या देशात कोणत्याही निवडणुकीत ६० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान होत नाही याचाच अर्थ देशातील ४० टक्के मतदार मतदान करित नाहीत. भारतीय मतदारांचा मतदानाबाबतचा हा निरुत्साह लोकशाहीला मारक आहे. विशेष म्हणजे सुशिक्षित वर्गातच मतदानाविषयी निरुत्साह दिसून येतो. मतदानादिवशी राष्ट्रीय सुट्टी असते या दिवशी मतदान करण्याऐवजी सहकुटुंब सहलीला जाण्याचा ट्रेंड सुशिक्षित वर्गात दिसून येतो आपण एकट्याने मतदान केले नाही तर काय फरक पडणार असाच आविर्भाव या लोकांमध्ये दिसून येतो. जे मतदान करतात त्यातील काही लोक मतदान करण्याऐवजी आपल्या मताची विक्री करतात. रोटी, बोटी, आणि चपटीसाठी काही जण आपले मत अक्षरशः विकतात. अर्थात सर्वचजण असे करतात असे नाही. बहुतेक जण विचार करुन आपल्या देशासाठी, समाजासाठी योग्य अशा उमेदवाराला मतदान करतात हे ही नाकारून चालणार नाही अशा लोकांची संख्या वाढली पाहिजे. लक्ष्मी दर्शन झाल्यानंतरच मतदान करणारे लोक बाबासाहेबांनी दिलेल्या या अस्त्राचा दुरुपयोग करतात. या लोकांमुळेच लोकशाही कलंकित होत आहे. बाबासाहेबांनी हे अस्त्र आपल्या हाती देण्यासाठी किती कष्ट सोसले याचीही जाणीव या लोकांना नाही. संविधानात मतदानाचा मूलभूत हक्क समाविष्ट करून बाबासाहेबांनी आपल्याला सर्वात मोठा हक्क मिळवून दिला आहे. आपलव हा मतदानाचा पवित्र हक्क बजावून प्रत्येकाने लोकशाही बळकट करायला हवी. प्रत्येकाने मतदानाचा हक्क जबाबदारीने बाजावल्यास देशाचे भविष्य बदलू शकते. त्यामुळे प्रत्येकाने निराशावादी भूमिका सोडून जागरूकतेने व स्वयंस्फूर्तीने प्रत्येक निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावून राष्ट्रीय कार्यामध्ये आपला खारीचा वाटा उचलायला हवा. लोकशाहीचे बळकटीकरण करावयाचे असेल तर जागरुक मतदारांचा एक मोठा वर्ग अस्तित्वात येणे आवश्यक आहे. त्यामुळे आपला देश विकसनशीलतेकडून विकसित देश होण्याकडे निश्चितच मदत होईल. १८ वर्षांपुढील सर्व सुजाण नागरिकांनी आगामी निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावला तरच राष्ट्रीय मतदार दिन साजरा केल्याचे सार्थक होईल.

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# अंजणी येथे अखंड शिवनाम सप्ताह व ग्रथंराज पारायण सोहळ्याचे आयोजन

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२३, नांदेड :** बिलोली तालुक्यातील अंजणी येथे दरवर्षी प्रमाणे यंदाही विश्वेश्वर महादेव मंदीर येथे शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर,शिवकिर्तनकार श्रीदेविताई कापसीकर,शिवकिर्तनकार कान्होपात्रा बामणीकर यांच्या अमृतवाणीतून संतांचा महिमा वर्णिल्या जाणार असून, सतत आठ दिवस अखंड शिवकिर्तन सोहळा चालणार आहे. या धार्मिक सोहळ्याचा लाभ घेण्याच्या आवाहन येथील सप्ताह कमिटीने केले आहे. गेल्या दोन दशकापासुन सुरु असलेल्या बिलोली तालुक्यातील अंजणी येथील विश्वेश्वर महादेव मंदीरात संतकथा व अखंड शिवणाम सप्ताहाचे २४ ते ३१ जानेवारी दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने धार्मिक कार्यक्रमाची मांदियाळी चालणार असून,पहाटे ५ ते ६ शिवपाठ,६ ते ७ रुद्राभिषेक,८ ते १० ग्रंथरहस्य पारायण ११ ते १२ प्रवचण,दुपारी २ ते ४ यावेळेत मन्मथगाथा भजन,५ ते ६ पोती प्रवचण,रात्री ९ ते १२ महाराजांच्या अमृतवाणीतून श्री संतकथेचा आस्वाद श्रोत्यांना मिळणार आहे. या अखंड शिवनाम सप्ताह सोहळ्यातील कीर्तन कार्यक्रम २४ जानेवारी रोजी ,शि.म.प.सौ.कान्होपात्रा बामणीकर, २५ शिवभक्त कैलास महाराज जामकर,२६ जाने.रोजी शिवभक्त श्रीदेविताई कापसीकर,२७ जाने रोजी शिवभक्त राजेश्वर स्वामी लाळीकर,२८ जाने रोजी शिवभक्त मोहनराव कावडे गुरुजी हासनाळीकर,२९ जाने रोजी शिवभक्त अमोल महाराज बनवसकर,३० जाने रोजी शिवभक्त त्र्यंबक स्वामी नंदगावकर,३१ जाने रोजी शिवभक्त त्र्यंबक स्वामी नंदगावकर तर ३० जाने.रोजी शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर,२८ रोजी सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर,३१ जाने रोजी सद्गुरु विरुपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर यांचे शिवार्वचन होणार असुन काल्याच्या कीर्तनाने व महाप्रसादाने या सोहळ्याची सांगता होणार आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## मानपाडा, महात्मा फुले चौक पोलीस ठाणे हद्दीत बांगलादेशी नागरीकांवर कारवाई




**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२४, कल्याण (ठाणे) :** पोलीस आयुक्त ठाणे शहर यांचे आदेशाने बांगलादेशी नागरीकांवर कारवाईची म ोहिम परिमंडळ ३ अतुल झेंडे यांच्या म ार्गदर्शनाखाली कल्याण हद्दीत सुरु असुन त्या अनुषंगाने १) मानपाडा पोलीस स्टेशन हद्दीत टाटानाका, देशमुख होम्स् जवळ, गांधीनगर झोपडपटटी, कल्याण पुर्व व २) महात्मा फुले चौक पोलीस ठाणे हद्दीत कल्याण पश्चिम रेल्वे परिसर या ठिकाणी बांगलादेशी नागरिक कोणत्याही कागदपत्रांशिवाय व भारत सरकारने विहीत केलेल्या मार्गाव्यतिरीक्त घुसखोरीच्या मार्गाने भारतात प्रवेश करुन बेकायदा वास्तव्यास असलेबाबतची गोपनीय माहिती मिळाल्याने मानपाडा व महात्मा फ ुले चौक पोलीसांनी स्वतंत्र पथके तयार करुन सदर दोन्ही ठिकाणी धाडी टाकुन पडताळणी केली असता एकुण ५ बांगलादेशी नागरिक विनापरवाना भारतात राहत असल्याने त्यांना कारवाई कामी अटक करण्यात आली आहे.

त्यानंतर त्यांची चौकशी करुन त्यांचेपैकी १) ४ बांगलादेशी नागरीकांवर मानपाडा पो.स्टे. गुन्हा रजि.नंबर ९१/२०२५ पारपत्र अधिनियम १९२० चे कलम ३,४, परकिय नागरीकांचा कायदा १९४६ चे कलम १३, १४ अ (ब) प्रमाणे व २) १ बांगलादेशी महिला नागरीकांवर महात्मा फुले चौक पो.स्टे. गुन्हा रजि.नंबर ७८/२०२५ पारपत्र अधिनियम १९२० चे कलम ३,४, परकिय नागरीकांचा कायदा १९४६ चे कलम १३,१४ अ (ब) प्रमाणे गुन्हे दाखल करुन पुढील तपास चालू आहे.

## निवृत्ती कासुटे यांचा प्रजासत्ताक दिनी उपोषण करण्याचा इशारा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, अहिल्यानगर :** पारनेर पंचायत समिती अंतर्गत असणाऱ्या ग्रामपंचायतीचे राज्य व केंद्र शासन स्वनिधीच्या योजनांचे शासकीय कपाती मधील रक्कम व जीएसटीच्या भरण्याबाबत झालेल्या अपहाराची चौकशी होण्यासाठी त्या एंटरप्राईजेस च्या बँक खात्याची चौकशी करुन सबंधित प्रकरणाची दप्तर तपासणी नाशिक विभागीय आयुक्त यांच्याकडून करण्याची

मागणी नाशिक विभागीय आयुक्त कार्यालय व जिल्हा परिषदेकडे निवेदनाद्वारे निवृत्ती नाना कासुटे सामाजिक कार्यकर्ते यांच्या वतीने करण्यात आली. या प्रकरणी कारवाई न झाल्यास प्रजासत्ताक दिनी जिल्हा परिषद समोर उपोषण करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते निवृत्ती नाना कासुटे यांनी दिला आहे. पारनेर पंचायत समिती अंतर्गत असणारे सर्व ग्रामपंचायत येथील सर्व राज्य व केंद्र शासनाच्या व निधीच्या अशा योजना मिळून जी कामे होतात त्याचे शासकीय भरणा पोटी असणाऱ्या रकमेचे खोटे चलन सेंट्रल बँक ऑफ इंडिया या बँकचे खोटे शिक्के बनवून, खोटे दस्तऐवज तयार करून त्यावर स्टॅम्प मारण्यात आले आहे. संबंधित कपाती शासनाला प्राप्त झाले आहेत व कसे ? याबद्दल खातरजमा करण्यात यावी. वास्तविक पाहता सदर कपातीचे पैसे ग्रामपंचायतीच्या शासकीय खात्यातून भरणे आवश्यक असताना, थर्ड पार्टी असलेल्या खाजगी व्यक्तीच्या वैयक्तिक खात्यावरून आदेश नसताना रक्कम भरण्यात आलेली आहे. या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

## खाद्य विक्रेत्यांच्या प्रश्नासंदर्भात खा.लंके यांनी काढला तोडगा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, अहिल्यानगर :** तारकपूर बस स्थानकावर अनेक वर्षापासून काही खाद्य विक्रेते हातावर व्यवसाय करत होते. मात्र तारकपूर बस स्थानक प्रशासनाच्या वतीने त्यांच्यावर अचानकपणे बंदी घातल्यामुळे ४० कुटुंबांचा उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला होता. या प्रश्नासंदर्भात खासदार निलेश लंके यांनी तारकपूर बस स्थानक येथे भेट देत खाद्य विक्रेते व प्रशासन यांची बैठक घेत चर्चा घडून आणली, सकारात्मक चर्चेनंतर प्रत्येक खाद्यविक्रेत्याला लायसन देण्याच्या सूचना केल्या त्यानुसार आता खाद्य विक्रेत्यांना लायसन मिळणार असून आता खाद्य विक्रेते बस स्थानकावर हातावर फिरवून पुन्हा व्यवसाय करतील. खाद्यविक्रेत्यांच्या प्रश्नासंदर्भात खासदार निलेश लंके यांनी तोडगा काढल्यामुळे खाद्य विक्रेते यांनी खासदार निलेश लंके यांचे आभार मानले यावेळी आगार प्रमुख अभिजित चौधरी, तारकपूर बस स्थानक प्रमुख अविनाश कलापुरे, माजी नगरसेवक भैय्या परदेशी, गणेश साठे, संदीप शिंदे यांच्यासह खाद्यविक्रेते आदी उपस्थित होते.

## पदमिनबाई पांडगळे यांचे निधन

**अक्षराज प्रतिनिधी**

**दि.२४, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील धनज येथील जेष्ठ नागरिक पद्मिनीबाई नागोराव पांडागळे वय ५५ यांचे दि. २३ गुरुवार रोजी सायंकाळी ऱ्हदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

त्यांच्या मागे तीन मुलं, सूना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिव देहावर दि.२४ रोजी शुक्रवारी राहत्या गावी स्म शानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. कांग्रेस



कार्यकर्ते संजय पांडागळे यांच्या त्या आई होत.

# पत्रकारिता हे दुधारी शस्त्र; पत्रकार ही अतुलनीय शक्ती - छगन भुजबळ




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२४, निफाड (नाशिक) :** निफाड येथील माणुसकी फाउंडेशनच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम वर्षभर राबविण्यात येतात. माणुसकी हे नाव त्यांनी सार्थ केले असून माणुसकी फाऊंडेशनचे काम वाखाणण्याजोगे असल्याचे प्रतिपादन राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी केले. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून माणुसकी फाऊंडेशनचे अध्यक्ष पत्रकार सागर निकाळे यांनी आयोजित केलेला पत्रकार गुणगौरव सोहळा हॉटेल गुलम ोहर येथे पार पडला. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी ज्येष्ठ नेते शिवाजीराव ढेपले, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे येवला विधानसभा अध्यक्ष वसंत पवार, तालुकाध्यक्ष भाऊसाहेब भवर, डॉ. श्रीकांत आवारे, भाऊसाहेब बोचरे, विनोद जोशी अण्णासाहेब बोरगुडे, आनंद जाधव, केशव जाधव, माणिक देसाई, युवक कॉंग्रेसचे सचिन खडताळे, भाऊसाहेब बोचरे, केंद्रप्रमुख जनार्दन पगारे, धारणगावचे पोलीस पाटील राहुल सोनवणे, निफाड नागरी चे अशोक फोफळिया, केशव जाधव, युवक कॉंग्रेसचे सचिन खडताळे, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख जनार्दन पगारे, विंचूरचे सुनील क्षिरसागर, रोहन सरोदे यांच्यासह निफाड पंचायत समितीचे सहायक गटविकास अधिकारी सुनील पाटील आणि तालुक्यातील पत्रकार बांधव उपस्थित होते. स्व.बाळासाहेब ठाकरे व नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या जयंती व छत्रपती शहाजीराजे भोसले यांच्या पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन करत. माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ म्हणाले की, महाराष्ट्रात पहिले वृत्तपत्र 'दर्पण' सुरू करण्याचा मान जातो तो श्री. बाळशास्त्री जांभेकर यांना जातो.

मराठी झुंजार पत्राकारितेची परंपरा चिपळूणकर बंधू, आगरकर, विठ्ठल राम जी शिंदे, लोकहितवादी, बापूजी अणे, माडखोलकर, शिवराम परांजपे, न. चिं. केळकर, कोल्हटकर, मामा वरेरकर, भोपटकर, अनंत गद्रे, खाडिलकर, परुळेकर इत्यादींनी पुढे नेली. ही सर्व मंडळी आपापल्यापरीने स्वदेश, सम ाजजागृती, सामाजिक सुधारणा यांकरता वृत्तपत्राच्या माध्यमातून कार्यरत होती. बाबासाहेबांचा 'मूकनायक' किंवा 'बहिष्कृत भारत', टिळकांचा 'केसरी', मराठी भाषेत नसला तरी 'हरिजन' आणि 'यंग इंडिया' ही महात्माजींची वृत्तपत्रे एका धोरणाभोवतीच सर्वस्व पणाला लावून काम करत होती. महात्मा फुले यांनी सहकार्याच्या माध्यमातून दीनबंधू हे वर्तमान पत्र सुरू केले.

मराठी पत्रकारितेचे हे प्रभावी कूळ आहे. त्यात रामभाऊ मंडलिक (कुलाबा समाचार), भाऊसाहेब म ाडखोलकर (तरुण भारत), रा. ग. जाधव (पुढारी), औरंगाबादचे अनंत भालेराव (मराठवाडा), सोलापूरचे रंगा वैद्य (संचार), बाबूराव जक्कल (सोलापूर समाचार), अमरावतीचे बाळासाहेब म राठे (हिंदुस्थान), दादासाहेब पोतनीस (गावकरी), वालचंद कोठारी (पुणे), ब्रिजलाल पाटील (जळगाव), गोविंद तळवलकर, माधव गडकरी अशी नावे जेव्हा सहजपणे समोर येतात तेव्हा जाणवते की, मराठी पत्रकारितेत एक दरारा होता, धाक होता, चारित्र्य होते. पुरोगामी विचारांचा संदेश घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात एक लोकविलक्षण क्रांती घडवली.

डॉ.आंबेडकरांच्या लेखणीने उपेक्षित, पददलित, विस्थापित साम ान्यजनांचे दु:ख 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', आणि 'समता' यांसारख्या नियतकालिकांतून मांडले असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, सम ाजात जिथे अन्याय होत असेल तिथे वाचा फोडण्याचे कार्य पत्रकार करत असतात.

वर्तमानपत्र ही समाजाचा आरसा आहे. सध्या पत्रकारितेत स्पर्धा अतिशय वाढली असून टीआरपीसाठी सकारात्म क बातम्यांपेक्षा नकारात्मक बातम्यांना अधिक प्रसिद्धी दिली जात असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. तसेच पत्रकारिता हे अतिशय मोठे शस्त्र आहे. हे दुधारी शस्त्र असून चांगल्या कामासाठी या शस्त्राचा वापर करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, मराठी पत्रकारितेला मोठा इतिहास आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्यानंतर ज्या ज्या वेळी समाजावर अन्याय होत होता. तेव्हा आपली सामाजिक जबाबदारी म्हणून पत्रकारांनी आपले कार्य केले आहे.

पत्रकारितेचा हा इतिहास नवीन पत्रकारांच्या पिढीला पत्रकारिता क्षेत्रात धैर्याने काम करण्याची प्रेरणा देतात. लोकशाहीचा चौथा खांब म्हणून पत्रकारितेकडे बघितले जाते. त्यामुळे लोकशाही मजबूत करण्यास पत्रकारितेचे योगदान अतिशय महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

# शासकीय, निमशासकीय रूग्णालये औषध प्रशासनाच्या रडारवर

## औषधांची होणार तपासणी; 3 महिने विशेष मोहीम

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, अहिल्यानगर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांच्या विशेष कार्यक्रमांतर्गत येथील औषध प्रशासनाने जिल्ह्यातील सर्व शासकीय व निमशासकीय रुग्णालयातून औषधी नमुने घेऊन बनावट औषधे आहेत की नाही, याची पडताळणी केली जणार आहे. एका महिन्यात ३० याप्रमाणे पुढील तीन महिन्यांत ९० नमुने घेऊन ते तपासणीसाठी छत्रपती संभाजीनगर येथील प्रयोग शाळेत पाठविण्यात येणार आहे.

दरम्यान, औषधे अप्रमाणित आढळून आल्यास संबंधित कंपनी व पुरवठादार यांच्याविरूध्द कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे सहायक आयुक्त अशोक बर्डे यांनी सांगितले. मागील काही दिवसांपूर्वी राज्यभरातील शासकीय रुग्णालयात बनावट औषधांचा प्रकार समोर आल्यामुळे सरकारने प्रत्येक जिल्ह्यातील शासकीय व निमशासकीय रुग्णालयातील औषधांची तपासणी करून त्याचे नमुने घेण्याचे आदेश औषध प्रशासनाला दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यभरात राबविलेल्या १०० दिवशीय विशेष कार्यक्रमांतर्गत औषध प्रशासनाने शासकीय व निमशासकीय रुग्णालयातील औषधांची तपासणी करण्याची मोहीम हाती घेतली आहे.

जानेवारी ते मार्च या तीन म हिन्यात सुमारे ९० नमुने घेतले जाणार आहेत. येथील औषध प्रशासनाकडे मनुष्यबळ कमी आहे. या मोहिमेत तीन निरीक्षक काम करणार आहेत.

**अप्रमाणित आढळल्यास कारवाई औषध निरीक्षकांकडून अचानकपणे तपासणी करून औषधांचे नमुने घेतले जाणार आहेत. ते नमुने छत्रपती संभाजीनगर येथील प्रयोगशाळेत पाठविले जाणार आहेत. त्यांना देखील याचा अहवाल देण्यात आले आहेत. औषध अप्रमाणित आढळून आल्यास संबंधित औषध कंपनी व पुरवठादार यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.**

प्रत्येक निरीक्षकाने एक महिनात १० नमुने घेऊन ते तपासणीसाठी पाठवायचे आहेत. त्यांच्याकडून जिल्हा रुग्णालय, जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग व म नपाचा आरोग्य विभागातून पुरवठा होत असलेल्या औषध भंडार मध्ये तपासणी करून तेथूनही नमुने घेतली जाणार आहेत.

या ठिकाणाहून जिल्हाभरात औषधांचा पुरवठा केला जात असतो. तसेच जिल्ह्यातील दोन ठिकाणी ऍलोपॅथीक औषध निर्माण करणाऱ्या कंपन्या आहेत. तेथे ही तपासणी केली जाणार आहे. याशिवाय जिल्ह्यातील रक्तपेढीला भेटी दिल्या जाणार असून तेथील आवश्यक ती तपासणी औषध प्रशासनाकडून केली जाणार आहे. शासकीय व निमशासकीय रुग्णालयात विवीध कंपन्यांचे औषधांचा पुरवठा केला जातो. ती औषधे अप्रमाणित असल्याची प्रकरणे राज्यभरात सम ोर आली होती. त्यामुळे औषध प्रशासनाकडून तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे.

# महिलांच्या लैंगिक छळाच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी 'अंतर्गत तक्रार निवारण समिती' स्थापन करावी

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२४, ठाणे :** कामाच्या ठिकाणी लैंगिक छळवणूकीस प्रतिबंध कायद्यानुसार, १० किंवा १० पेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या प्रत्येक आस्थापनेम ध्ये महिला तक्रार निवारण समिती असणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक, खासगी आस्थापनांनी अशा समितीचे गठन करण्याचे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय बागूल यांनी केले आहे.

शासकीय, निमशासकीय कार्यालय, संघटना, महामंडळे, आस्थापना, स्थानिक प्राधिकरण किंवा शासकीय कंपनी किंवा नगरपरिषद किंवा सहकारी संस्था अशा सर्व आस्थापना, तसेच कोणतेही खाजगी क्षेत्र, संघटना किंवा खाजगी उपक्रम/संस्था, एंटरप्रायजेस, अशासकीय संघटना, सोसायटी, ट्रस्ट, उत्पादक, पुरवठा, वितरण व विक्री यासह वाणिज्य, व्यावसायिक, शैक्षणिक, करमणूक, औद्योगिक, आरोग्यसेवा किंवा वित्तीय कामकाज पार पाडणारे युनिट किंवा सेवा पुरवठादार, रुग्णालये, शुश्रुषालये, क्रिडा संस्था, प्रेक्षागृहे, क्रीडा संकुले आदी ठिकाणी किंवा अधिनियमात नमूद केलेल्या कामाच्या शासकीय व खाजगी क्षेत्रातील कार्यालयाच्या ठिकाणी शासन निर्णयाप्रमाणे अंतर्गत तक्रार समिती गठित करणे बंधनकारक आहे.

समिती न स्थापल्यास ५० हजार दंड-अधिनियम कलम २६ मध्ये जर एखाद्या मालकाने अंतर्गत तक्रार समिती स्थापन केली नाही आणि कायद्यातील व नियमातील विविध तरतुदींचे व जबाबदाऱ्यांचे पालन न केल्यास मालकाला ५० हजार रुपयापर्यंत दंड होईल. दुसऱ्यांदा आढळल्यास परवाना रद्द, दुप्पट दंड अशी तरतूद आहे. तरी ठाणे जिल्ह्यातील सर्व आस्थापनांनी अंतर्गत तक्रार समिती गठित करुन तसा अहवाल जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, ठाणे नियोजन भवन २ माळा, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, कोर्ट नाका ठाणे येथे तात्काळ सादर करावा. तसेच Email- dwedothane234gmail. com,dwcdothaneyahoo.co.in मेल आयडीवर पाठविण्यात यावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय बागूल यांनी केले आहे.

# तरुणाईने श्रमसंस्कारातून नवनिर्मितीच्या वाटा निर्माण कराव्यात-अनिरुद्ध गाढवे

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२४, खंडाळा (सातारा) :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर संलग्न खंडाळा विभाग शिक्षण समिती संचलित सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय व राजेंद्र उच्च माध्यमिक विद्यालय खंडाळा यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे कवठे (जवळे) येथे दि.२३ ते २९ जानेवारी २०२५ अखेर विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उदघाटन खंडाळा विभाग शिक्षण समिती सचिव अनिरुद्ध(संजीव) गाढवे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

यावेळी बोलताना अनिरुद्ध गाढवे म्हणाले - वर्तमान आधुनिक युगात विद्यार्थी मोबाईलच्या विळख्यात पूर्णपणे गुंतला आहे. यातून बाहेर पडण्यासाठी तरुणाईने श्रमसंस्कारातून नवनिर्मितीच्या वाटा निर्माण कराव्यात, कवठे गावाचे सुपुत्र सद्या आयआयटी मुंबई येथे कार्यरत डॉ.तुषार जाधव यांच्या घवघवीत यशाचा संपूर्ण तालुक्याला अभिमान आहे असे गौरवोदगार यावेळी त्यांनी काढले.प्राचार्य शब्बीर नालबंद म्हणाले-श्रमसंस्कार शिबीर विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकास पूरक असून विद्यार्थ्यांनी याद्वारे गावाचा नॉट मी बट यु या तत्वावर विकास करावाप्राचार्य डॉ.हणमंत जाधव म्हणाले -आभासी जीवनात जगणाऱ्या तरुणाईला समाजभान जागविणारा सोहळा म्हणजे निवासी श्रमसंस्कार शिबीर होय. यावेळी मान्यवरांचे स्वागत व प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रदीप मेंढापुरे यांनी व प्रा.अक्षय वाघापुरे, प्रा.गेजगे यांनी संयोजन केले. प्रा.कोंढाळकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ.प्रतिभा पाटणे यांनी आभार मानले. यावेळी संचालक वसंतराव पंडित, सरपंच छाया पिसे, उपसरपंच चारुशीला जाधव, योगेश खोपडे,चंद्रकांत पिसाळ, शोभा भोसले, ग्रामसेवक गणेश शिर्के,मुख्याध्यापक बांगर ग्राम महसूल अधिकारी चव्हाण यासोबत ग्रामस्थ विद्यार्थी विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.

# प्रजासत्ताक दिनानिमित्त पंढरीत पत्रकारांसाठी सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२४, पंढरपूर :** सध्याच्या धकाधकीच्या जीवनात पत्रकारांवरील जबाबदारी वाढली आहे. त्यांच्यावर येणारा मानसिक व शारीरिक ताण पाहता पत्रकारांनी आपल्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे असल्याने पंढरपूर शहर व तालुक्यातील सर्व पत्रकार बांधव आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी सर्व रोगनिदान शिबिराचे आयोजन प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून पंढरपूर येथे मराठी पत्रकार संघ संलग्न पंढरपूर पत्रकार संघ व डॉ.काणेज सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत डॉ. काणेज सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल कराड रोड पंढरपूर येथे करण्यात आले आहे.

या शिबिराचे उद्धाटन मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, प्रमुख उपस्थिती उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. महेश सुडके, डॉ. सुरेंद्र काणे, डॉ. सुजाता काणे उपस्थित राहणार आहेत.

या सर्व रोगनिदान शिबिरामध्ये हृदय तपासणी, हाडातील कॅल्शियमची तपासणी, रक्तातील साखरेची तपासणी, डोळे तपासणी, दंत तपासणी, ई.सी.जी, याचबरोबर सर्व आजाराचे निदान करण्यासाठी लिपिड प्रोफाइल रक्ताची तपासणी केली जाणार आहे. या तपासणीसाठी रात्री १० ते सकाळी १० वाजेपर्यंत अन्न व पाणी घेऊ नये वरील सर्व तपासण्या मोफत केल्या जाणार आहेत.

याचबरोबर इको टुडे ही तपासणी ५० टक्के सवलतीत केली जाणार आहे. यामध्ये निष्पन्न होणाऱ्या आजाराचे निदान योजनेनुसार मोफत केले जाणार आहेत. तरी वरील सर्व आरोग्याची तपासणी करण्यासाठी पंढरपूर शहर व तालुक्यातील पत्रकार बांधवांनी वेळेवर उपस्थित राहावे. असे आवाहन मराठी पत्रकार संघाचे प्रदेश सहसचिव हरिभाऊ प्रक्षाळे यांनी केले आहे.

# हरिनाम कीर्तन सोहळा शिळगांव २०२५ चे आयोजनः वर्ष १२ वे

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२४, शिळफाटा (ठाणे) :** सोमवार दिनांक २७ जानेवारी २०२५ ते २९ जानेवारी २०२५ रोजी हरिनाम कीर्तन सोहळाचे शिळगांवमध्ये वेशी आई मंदिर, शिळगांव, पोस्ट पडले, ता.जि ठाणे या ठिकाणी आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी हरिनाम कीर्तन सोहळ्याला १२ वर्षे पूर्ण होत आहे. एक तपोवन पूर्ण होत आहे. ह.भ.प.वै.स्वा. वामन बाबा, ह.भ.प.वै.स्वा.सावळाराम बाबा महाराज, ह.भ.प.वै.स्वा.वासुदेव महाराज, ह.भ.प.वै.स्वा.रामदासबुवा, ब्रह्मीभुत महंत प. पू. स्वामी डी. के. दास जी महाराज, ब्रह्मीभुत प. पू. खंडेश्वर महाराज, वेशी आई या सर्वांच्या कृपा आशीर्वादाने आणि ह.भ.प. जगन्नाथ बुवा, (उत्तरशिव उपाध्यक्ष २६ गावे एकादशी) ह.भ.प. मदन बुवा, ह.भ.प. हेमंत बुवा (कौसा) यांच्या मार्गदर्शनाखाली हा हरिनाम किर्तन सोहळा शिळगांव चे आयोजन करण्यात आले आहे. सदभावना, सतप्रकृती व स्वधर्म यांची वाढ होऊन भक्तिभाव सोहळा परस्परातील प्रेम भावना यांची वृद्धी आणि मानवाची पारमार्थिक उन्नती व्हावी. या उद्देशाने हा सप्ताह सुरू केला आहे. सर्व संत मंडळी, पंचक्रोशीतील ग्रामस्थ मंडळीनी, अंगत्य उपस्थित राहून या ज्ञान अमृताचा लाभ घ्यावा. अशी विनंती आणि आव्हान शिळगांवातील ग्रामस्थांनी केला आहे. वेशी आई श्री सत्यनारायणाची महापूजा सोमवार दिनांक २७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० ते १ वाजेपर्यंत असणार आहे.प्रवचन सायंकाळी ४:३० ते ५;३० वाजेपर्यंत असणार आहे. ह.भ.प. पांडुरंग महाराज यांचे सुपुत्र ह.भ.प. रामकृष्ण महाराज मुंढे (नारिवली) अध्यक्ष आ.स.पा.दि.संस्था हे सर्वांना प्रबोधन करणार आहेत. सायंकाळी हरिपाठ ५:३० वाजता सुरू होईल संत गाडगेबाबा महिला महिला हरिपाठ मंडळ काटई, चालक: सुनंदा चौधरी, साधना चौधरी, मृदंग: सुभाष पाटील, हर्ष चौधरी यांचा हरिपाठ होणार आहे. सायंकाळी ७ ते ९ वाजेपर्यंत कीर्तन ह.भ.प. सुभाष महाराज पाटील (नागोठणे ) रात्री ९;३० ते १०:३० जागरण भजन, श्री ज्ञानेश्वर माऊली भजन मंडळ कौसा, गायक : कु .अथर्व बुवा फौजदार मृदंग: वेध बुवा फौजदार यांचं असणार आहे.

मंगळवार दिनांक २८ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ३:०० वाजता दिंडी सोहळा चे आयोजन करण्यात आले आहे. ह. भ .प.जगन्नाथ बुवा (उपाध्यक्ष उत्तरशिव) नाशिकेत बुवा (नागाव )यांच्या नेतृत्वाखाली दिंडी सोहळ्याचे चे आयोजन करण्यात आले आहे. मृदंग मनी : संदेश बुवा, वेद बुवा कौसा, ज्ञानेश्वर बुवा, मित्रनाथ बुवा, चंद्रकांत (नागाव) सदाबुवा, हेमंत बुवा गोपीनाथ बुवा, मदन बुवा, कपिलबुवा, मेघनाथ




बुवा (कौसा) हरिबुवा, वामन बुवा,( घेसर) सुदाम बुवा, किसन बुवा ( खार्डी) फडकेपाडा,खार्डी, कौसा,डायघर, उत्तरशिव, देसाई, मोठी देसाई, पडले, खिडकाळी, भंडार,ली मोकाशी पाडा, दहिसर, दहिसर मोरी, पिंपरी, नेवाळी, नागांव, वाकळण,बामाली, निघू, नारिवली, घेसर, निळजे, कोळे, काटई, हेदुटणे, खोणी, मानपाडा, संदप, बेतवडे, दातिवली, म्हाताडी, आगासन, दिवा, साबे व सामुदायिक हरिपाठ मंडळ २६ गावेकर एकादशी ग्रुप, सर्व गावातील वारकरी संप्रदाय ग्रामस्थ भाविक भक्त दिंडी सोहळ्याला सहभागी होणार आहेत. मंगळवार दिनांक २८ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ७:०० ते ९:०० किर्तन ह.भ.प.डॉ.नाना महाराज कदम (बंकट स्वामी संस्थान नेकनूर –बीड) यांचं कीर्तन होणार आहे.

बुधवार दिनांक २९ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता काल्याचे सुश्राव्य किर्तन : ह भ प गुरुवर्य साळाराम महाराज यांचे नातू ह. भ. प.चेतन महाराज म्हात्रे (कोपर डोंबिवली) अध्यक्ष : वारकरी सं.प्र.मंडळ ठाणे – रायगड यांचे कीर्तन होणार आहे. मृदंगमणी: ह. भ.प अनंत बुवा (बेतवडे) सुमित बुवा, निवृत्ती बुवा, (देसाई) जयेंद्र म्हात्रे (ओवेगाव) संदेश बुवा, वेद बुवा, (कौसा) अविनाश बुवा, नवनाथ बुवा, चंद्रकांत (नागांव) तेजस महाराज मडवी (खारबाव) या सर्व मृदुंगमणी यांची साथ कीर्तनाला लाभणार आहे. चौपदार ह.भ.प. सुरेश बुवा (दातिवली) ह.भ.प. ज्ञानेश्वर बुवा (देसाई) संदीप नामदेव भोईर (शिळगांव) हे सर्व तीन दिवस चोपेदार असणार आहेत. विणेकरी : ह.भ.प.मंगल बुवा (नागाव) पहिला दिवस, ह.भ.प. नारायण बुवा (नारिवली) दुसरा दिवस, ह.भ.प.गणपत बुवा (देसाई) दिवशी विणेकरील असणार आहे. असा हा हरिनाम कीर्तन सोहळा तीन दिवस शिळगावात साजरा होणार आहे. यासाठी साधुसंत, वारकरी संप्रदाय, भाविक भक्त, सर्वांनी मोठे संख्येने उपस्थिती दाखवावी असे ग्रामस्थांकडून आव्हान करण्यात आले आहे. या तीन दिवसात शिळगावात हरिनामाचा गजर होणार आहे.

## बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त दिव्यात विविध उपक्रम



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि. २४, दिवा (ठाणे) :** हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शहर संघटिका ज्योती पाटील यांच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ८० टक्के समाजकारण २० टक्के राजकारण बाळासाहेब ठाकरे यांच्या धोरणेनुसार प्रभागातील नागरिकांसाठी ज्योती पाटील यांच्या वतीने विविध उपक्रम आयोजित करण्यात येत असतात. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमाला नागरिकांनी उपस्थिती लावली. यावेळी शहरातील नागरिकांसाठी आधार कार्ड, पॅन कार्ड, व नवीन मतदार नोंदणी शिबिर त्याचबरोबर आरोग्य शिबिर व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रभागातील नागरिकांनी या लोकोपयोगी उपक्रमाचा यावेळी लाभ घेतला. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विभाग प्रमुख नागेश पवार, उपविभाग प्रमुख संजय अदलकर, विभाग संघटिका सुहासिनी गुळेकर, विभाग संघटिका वृषाली साळुंखे, उपशाखा संघटिका शोभा तारले, वैशाली अदलकर, अजित माने, अशोक आंबोणकर, दीपक उतेकर,शैलेश कदम, संजय निकम, विलास उतेकर, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## माथेरान घाटात डस्टर गाडी जळून खाक



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२४, माथेरान :** नेरळ माथेरान घाटामध्ये डस्टर गाडीने पेट घेतल्याने नेरळ माथेरान गाठ सकाळी २ ते ३ तास बंद राहिला. शुक्रवार, शनिवार, रविवार हा माथेरानचा सीझनचा दिवस असल्याने सकाळच्या वेळेसच चांगभले तिसऱ्या टन ला वाशी मुबई मुंबई येथून येणारे पर्यटक आपली MH 43AN9468 डस्टर गाडीने माथेरानला येत असताना अचानक घाटामध्ये गाडीने पेट घेतल्याने घाटामध्ये दोन्ही बाजूची वाहतूक खोळंबी गाडीचे मालक यांना ती गाडीमध्ये आग लागण्याची लक्षात येताच त्यांनी गाडीमधून बाहेर आले. त्यामुळे मोठी दुर्घटना तळली अन्यथा घाटामध्ये अशी काही गोष्ट घडली तर अत्यावश्यक सेवा येण्यास फार विलंब लागतो.

परंतु प्रसंग सावध राहून गाडीमध्ये सर्व बाहेर पडले आणि क्षणार्धात गाडीला आगीने एक रुद्र रूप धारण केले. गाडी पूर्णपणे आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. ज्या ठिकाणी घटना घडली. त्या ठिकाणी मोबाईल रेंज कमी असल्याने माथेरान फायर ब्रिगेड गाडी येईपर्यंत खुप उशिरा झाला होता. तो पर्यंत गाडीचा फक्त सांगाडा धुमसत होता.

# मराठी भाषा ज्ञान भाषा झाली पाहिजे - डॉ.आरसुळे

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२४, पालम (परभणी) :** भाषा हे माणसांच्या अभिव्यक्तीचे माध्यम आहे. माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात मराठी ही भाषा आज अभिजात भाषा म्हणून मान्य केली गेली असली तरी मराठी ही भाषा ज्ञानभाषा झाली पाहिजे. यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. असे आवाहन उपप्राचार्य डॉ. आत्माराम आरसुळे यांनी केले.

ते शहरातील माधवराव पाटील महाविद्यालयात मराठी विभागाने आयोजित केलेल्या मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून बोलत होते. यावेळी




प्रमुख पाहुणे म्हणून संशोधक डॉ. नानासाहेब पाटील व विभागप्रमुख डॉ.भारत शिंदे यांची उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांनी मराठी भाषेची परंपरा आणि समृद्ध वारसा याचे अभ्यासपूर्ण विश्लेषण केले. या पंधरवडयानिमित्त महाविद्यालयात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

त्यात कथा लेखन स्पर्धा, निबंध स्पर्धा घेण्यात आल्या, यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय बालाघाटे यांनी केले. तर सूत्रसंचालन डॉ.कालिदास गुडदे यांनी केले. तर कु.वैष्णवी मलुले यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ डी.पी.गडगिळे, जी.एन. सोनटक्के, प्रा.अभिजित निर्वळ, प्रा.ऋतिका सूर्यवंशी यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थीनी, प्राध्यापक वृंद मोठया प्रमाणात उपस्थित होते.

# थोडक्यात

## स्वातंत्र्य सैनिक हुतात्मा स्मारके विकास करण्याचा जिल्हाधिका-यांनी घेतला आढावा

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२३, नांदेड :** नांदेड जिल्ह्यात शासनाने स्वातंत्र्य सैनिकांच्या सन्मानार्थ उभारलेल्या १६ हुतात्मा स्मारकांची दुरावस्था झाल्याने मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी वर्षा निमित्त स्मारकांची दुरुस्ती, रंगरंगोटी करून शुशोभीकरण करण्याची मागणी स्वातंत्र्यसैनिक उत्तराधिकारी समितीच्या वतीने स्वातंत्र्यसैनिक शेषराव पाटील सेवाभावी संस्थेचे स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य विकास संस्थेचे अध्यक्ष केदार पाटील साळुंके यांनी शासनासह जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री गिरीश महाजन यांच्याकडे सातत्याने मागणी केलेली होती. मात्र अद्याप विकास झाला नसल्याने आंदोलनाचा पवित्रा घेतला होता. त्याची जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दखल घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयात नुकतीच संबंधित अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेऊन तातडीने विकास आराखडा सादर करण्याच्या सूचना दिल्या असल्याने आंदोलन माघार घेण्यात आल्याचे केदार पाटील यानी यावेळी सांगितले. मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी वर्ष नुकतीच पार पडले या अमृत महोत्सवी वर्षात शासनाने नांदेड जिल्ह्यातील १६ ही हुतात्मा स्मारकांची झालेली दुरावस्था या मुक्ती संग्राम अमृत महोत्सव वर्षात त्या ठिकाणचा विकास करून येथे दुरुस्तीसह शुशोभीकरण करण्याची मागणी स्वातंत्र्यसैनिक उत्तर अधिकारी समितीच्या वतीने शासनाकडे तत्कालीन पालकमंत्री, जिल्हाधिकारी यांच्याकडे सातत्याने करण्यात आली त्यावेळी केवळ रंगरंगोटी करण्यात आल्याने मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी कार्यक्रमात तत्कालीन पालकमंत्री गिरीश महाजन यांची भेट घेऊन सर्वांगीण विकासाची मागणी केली असता तातडीने विकास आराखडा सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांना त्यांनी दिलेल्या होत्या. मात्र अद्याप विकास झाला नसल्याने मागील १७ सप्टेंबर या मुक्ती संग्राम दिनी काळ्या फिती लावून साजरा करण्याचा इशारा देण्यात आलेला होता. त्यावेळी २६ जानेवारी पर्यंत विकास करण्याचे लेखी देण्यात आले. अद्याप विकास झाला नसल्याने जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन मागणी केली असता जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी संबंधित सर्व अधिकाऱ्यांची जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा घेऊन तातडीने आराखडा सादर करण्याच्या सूचना दिल्याने दि.२६ जानेवारी चे नियोजीत आंदोलन १५ ऑगस्ट पर्यंत स्थगित करण्यात येत असल्याची माहिती केदार पाटील साळुंके यांनी दिली आहे.

## ग्रामसंवाद सरपंच संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी रमेश लखे



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२४, मुदखेड (नांदेड) :** नांदेड जिल्हा ग्राम संवाद सरपंच संघटना जिल्हाध्यक्षपदी रमेश पाटील लखे जवळेकर यांची निवड करण्यात आली आहे. या माध्यमांतून जिल्ह्यात संघटना बांधणी आणि विविध शासकीय योजना प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष रमेश लखे यांनी केला आहे. राज्यात ग्रामसंवाद सरपंच संघटनेची बांधणी प्रत्येक जिल्ह्यात चालू असून या माध्यमांतून विकास प्रक्रिया तळागाळापर्यंत प्रभावी राबविण्याचा मानस संस्थापक अध्यक्ष आजिनाथ धामने यांनी व्यक्त केला आहे. मुदखेड तालुक्यातील जवळा मुरार गावचे रमेश पाटील लखे यांची जिल्हाध्यक्ष पदी निवड केली आहे. जिल्ह्यातील प्रत्येक गावात ग्रामसंवाद संघटनेच्या माध्यमांतून शासनाच्या विविध योजना प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार करण्यात आला आहे. ग्रामसंवाद सरपंच संघटनेचा कालावधी दोन वर्षांचा कालावधी असून सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांच्या कामाची दखल घेऊन नियुक्ती केली जाते. लखे यांच्या नियुक्तीचे पत्र प्रदेश सचिव विशाल पाटील लांडगे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आहे. लखे यांच्या निवडीचे जिल्ह्यातील सरपंच संघटनेने स्वागत केले आहे. सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कैलास पाटील पाथरडकर, उपसरपंच एकनाथ कदम, राम गावंडेवाड, सरपंच ज्ञानेश्वर गौडेवाड, साहेबराव गोरकवाड आदिंनी स्वागत केले आहे.

## मुदखेड पोलिस ठाणे येथे कायदे विषयक कार्यशाळा संपन्न



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२३, मुदखेड (नांदेड) :** महाराष्ट्र शासनाचे प्रोजेक्ट मधील कार्यक्रमानुसार पोलीस अधीक्षक यांच्या आदेशान्वये मुदखेड पोलीस ठाणे येथे मुदखेड ठाण्याचे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे, व डीएसबीचे किशोर पाटील यांनी कार्यशाळेचे आयोजन नुकतेच केले होते. या कार्यशाळेत भारतीय न्याय संहिता या विषयावर माहिती देण्यासाठी मुदखेड न्यायालयाचे सहाय्यक सरकारी अभियोक्ता एस. बी. पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेचे प्रस्ताविक पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांनी केले.

यानंतर एस बी पवार यांनी कार्यशाळेत उपस्थित असलेल्या तालुक्यातील पोलीस पाटील तंटामुक्ती अध्यक्ष प्रतिष्ठित नागरिक व पत्रकार बांधवांना भारतीय न्याय संहिता या नवीन कायद्याविषयी माहिती दिली यामध्ये नवे गुन्हे जसे समाविष्ट करण्यात आले आहेत. तसे काही नवीन शिक्षेचे प्रकारे समाविष्ट करण्यात आलेले आहेत. यादी दंड जप्ती साधी कैद तीन वर्षापर्यंत कारावास अजन्म कारावास ७ वर्षापर्यंत फक्त मजुरी फाशी असे मुख्य प्रकार असायचे यामध्ये आता नव्याने छोट्या मोठ्या गुन्ह्यासाठी ज्यांची ज्यांची शिक्षा अधिकाधिक ३ वर्षे आहे. अशा गुन्ह्यासाठी कम्युनिटी सर्विस म्हणजे (सामाजिक सेवा) नावाची शिक्षा चालू होणार आहे.

तसेच महिलांन विषयी नविन कायदा, ऑडिओ, व्हिडिओ, करताना कसे करावे यावरही थोडक्यात माहिती एस.बी.पवार यांनी दिली आहे. या कार्यशाळेचे सुत्रसंचालन पत्रकार संजय कोलते यांनी केले तर आभार एपीआय कांबळे यांनी मानले. या कार्यशाळेत प्रसंगी सहाय्यक सरकारी अभियोक्ता एस.बी.पवार, पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक वसंत सप्रे, सहाय्यक पोलीस निरीक्षक बी.आर.कांबळे, सहाय्यक पोलिस निरिक्षक खेडकर, डिएसबीचे किशोर पाटील, ,कॉंग्रेस कमिटी शहराध्यक्ष कैलास गोडसे, जेष्ठ पत्रकार जयराम वने, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, तालुक्यातील पोलिस पाटील, व महिला पोलिस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष आणि पत्रकार बांधवांची उपस्थीती होती.